श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-८, अंक-३ | मार्च-२०२० | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १२ |

## किशोरवयीन मुलींच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

“New Directions for Research in Diabetes in India: The harbinger of future Diabetes- An Adolescent and preconception Health Perspective (DERVAN cohort) PHASE-1” हा राजीव गांधी सायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी सेंटर, मुंबई यांनी अर्थसाहाय्य केलेला संशोधन प्रकल्प डेरवण येथे भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात सुरू आहे. दि. १५ फेब्रुवारी २०२० रोजी ‘पुनरावलोकन समिती’ची तिसरी सभा डेरवण येथे झाली. डॉ. रिटा मुल्हेरकर (Head, Division of Genetic Engineering, Advance Center for Treatment Research and Education in Cancer (ACTREC), Tata Memorial Centre) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला पुढील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

१) डॉ. आर. के. मुटाटकर, Chairman, 'Indian Association of Human Behavior' (IAHB), and Patron, 'Society for Indian Medical Anthropology' (SIMA).

२) डॉ. के. आर. मुटाटकर, Community Gyneacologist

३) डॉ. आनंद देशपांडे, Transfusion Medicine, Hinduja Hospital, Mumbai

४) डॉ. आनंद जोशी, Gastroenterologist, Hinduja Hospital

५) डॉ. नितीन इनामदार, Biochemist, Tata Memorial Hospital, Mumbai

७) डॉ. उल्का बाणवली, Nutritionist, Nirmala Niketan, Mumbai

८) डॉ. वीणा यार्दी, Nutritionist, Nirmala Niketan, Mumbai

या सभेला या प्रकल्पातील कर्मचारी वर्गही उपस्थित होता. किशोरवयीन मुलींच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर उपस्थित तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.




*डॉ. रीटा मुल्हेरकर यांच्या अध्यक्षतेखाली पुनरावलोकन समितीची सभा*

# डॉ. सारा मारिआ यांची डेरवण रुग्णालयाला भेट

डॉ. सारा मारिआ (इटली) यांनी नुकतीच डेरवण रुग्णालयाला भेट दिली. त्या संसर्गजन्य रोगांविषयी विशेष संशोधन करीत असून त्या संदर्भात त्यांनी ही भेट दिली. त्यांनी Tropical Medicine and Health Cooperation या विषयात विशेष अभ्यास केला असून University Clinic of Infectious Diseases, University of Turin, Turin (Italy) मध्ये त्या 'एच.आय.व्ही.'वर विशेष संशोधन करीत आहेत. त्यांनी आंगणवाड्या तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या आणि गरोदर स्त्रियांच्या प्रसूतीपूर्व तपासण्या केल्या. 'ही भेट माझ्यासाठी माहितीपूर्ण आणि उपयुक्त ठरली, तसेच येथील माझे वास्तव्य मला आनंददायक वाटले' अशी भावना त्यांनी निरोप घेताना व्यक्त केली.




*डॉ. सारा मारिआ यांची आंगणवाडीला भेट.*

# लॅम्प लायटिंग सेरेमनी

समर्थ नर्सिंग कॉलेजच्या ANM, GNM आणि B. Sc. Nursing ची पहिली तुकडी यांचा 'लॅम्प लायटिंग सेरेमनी' दि. ७ फेब्रुवारी २०२० रोजी साजरा करण्यात आला. हा समारंभ प्रत्येक परिचारिकेसाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा असतो. या समारंभात शपथ ग्रहण केली जाते आणि त्याद्वारे परिचारिकेच्या कामाचे महत्त्व औपचारिकरीत्या अधोरेखित केले जाते. समारंभाच्या सुरुवातीला M. Sc. Nursing प्रथम वर्षाच्या विद्यार्थीनींनी स्वागतपर भाषण केले. डॉ. सुवर्णा पाटील यांनी या प्रसंगी सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात परिचारिकेचे स्थान किती महत्त्वाचे आहे याविषयी आपले विचार व्यक्त केले. परिचारिकेने रुग्णांची काळजी घेणे, त्यांना प्रेम देणे आणि त्यांच्या समस्यांविषयी सहानुभूती बाळगणे आवश्यक आहे असे सांगून ही संस्था कोणत्या ध्येयाकडे आणि कोणत्या तत्त्वावर वाटचाल करते याची आठवण करून दिली. नंतर दीप प्रज्वलन करण्यात येऊन परिचारिकांना संस्थेच्या प्राचार्यांच्या हस्ते प्रकाशित दिवे देण्यात आले आणि परिचारिकांनी शपथ ग्रहण केल्यावर समारंभाची सांगता झाली.



*दीप प्रज्वलन आणि शपथ ग्रहण समारंभ*

# मोतीबिंदू महाशिबिर

"YOUR VISION OUR MISSION" या नावाची एक मोठी 'मोतीबिंदू निर्मूलन' मोहीम लुपिन फाउंडेशन, सिंधुदुर्ग; सिंधुदुर्ग लाईव्ह हे टी. व्ही. चॅनेल आणि वालावलकर रुग्णालय यांनी संयुक्तरीत्या हाती घेतली आहे. या मोहिमेची पूर्वतयारी म्हणून जानेवारी २०२० मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोतीबिंदूचे रुग्ण शोधून काढण्यासाठी अनेक शिबिरे घेण्यात आली. संपूर्ण जिल्ह्यात सुमारे ३००० लोकांची तपासणी करण्यात आली आणि त्यातील १४०० लोकांमध्ये दृष्टिदोष आढळून आले. आता या १४०० लोकांवर डेरवण रुग्णालयात मोफत उपचार करण्यात येतील. त्यांचा जाण्यायेण्याचा खर्च 'लुपिन फाउंडेशन' करणार आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा 'मोतीबिंदूमुक्त' करण्यासाठी दि. १ फेब्रुवारीपासून या कार्यक्रमाला सुरुवात झाली असून २०-२० च्या गटाने रुग्णांना डेरवणला आणून उपचार केले जातात. आत्तापर्यंत १०० रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत.



*मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले सिंधुदुर्गातील रुग्ण*

# माध्यमिक विद्यार्थ्यांचे एक दिवसीय शिबिर

दहिवली माध्यमिक विद्यालयाच्या सातवी ते दहावीमधील सुमारे ३५ विद्यार्थ्यांचे एक दिवसीय शिबिर डेरवण रुग्णालयात घेण्यात आले. वालावलकर कॉलेज ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीजच्या श्री. कोरोचीकर यांनी त्यांना भावी आयुष्यात करावयाच्या व्यवसाय निवडीच्यासंदर्भात मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे या वयात होणारे शारीरिक आणि मानसिक बदल, शारीरिक स्वछता आणि आरोग्य याविषयीही माहिती देण्यात आली. आपल्या वेळेचे व्यवस्थापन, स्मरणशक्ती वाढवणे यासाठी वेगवेगळे क्रियाकलाप घेण्यात आले. 'ड्रिम हेल्थ पार्क'ला दिलेली भेट या शिबिरात शिकवलेल्या गोष्टींचे अधिक सुलभपणे आकलन होण्यासाठी उपयुक्त ठरली. आजचे शिबिर माहितीपूर्ण, ऊर्जादायी आणि आम्हाला उपयुक्त असे होते अशी प्रतिक्रिया सहभागी मुलांनी दिली.



*विद्यार्थ्यांची ड्रिम हेल्थ पार्कला भेट*



*विद्यार्थ्यांकडून करून घेतलेले क्रियाकलाप*

# एकात्मिक बालविकास योजना केंद्र, चिपळूण आयोजित 'डब्बा पार्टी'

दि. १५.२.२०२० महिला व बाल विकास विभाग, चिपळूण, रत्नागिरी, प्रकल्प १ व प्रकल्प २ आणि भ.क.ल. वालावलकर रुग्णालय यांनी संयुक्तपणे 'डब्बा पार्टी' या उपक्रमाचे आयोजन केले होते. पौष्टिक आणि आरोग्यदायी आहाराविषयी जागृती निर्माण करणे हा या आयोजनाचा उद्देश होता. आहार आणि आरोग्य याविषयी जनजागृती करणारे एक चर्चासत्रही या वेळी घेण्यात आले. लहान मुले, गरोदर स्त्रिया, तान्ह्या बाळांना अंगावर पाजणाऱ्या स्त्रिया, किशोरवयीन मुली, ज्यांच्या रक्तातील हिमोग्लोबीनची पातळी कमी आहे अशा व्यक्ती यांचा आहार कसा असावा याविषयी 'निर्मला निकेतन कॉलेज ऑफ होमसायन्स'च्या एम.एससी.च्या विद्यार्थिनींनी मार्गदर्शन केले. यासाठी त्यांनी छोट्या नाटिका, मनोरंजक कोडी आणि चित्रे यांचा वापर करून विषय सुलभ करून सांगितला.



*डब्बा पार्टीत सहभागी आंगणवाडी सेविका आणि अधिकारी वर्ग*

या प्रकल्पाचे अधिकारी, १४ पर्यवेक्षक आणि ३०० आंगणवाडी सेविका या शिबिरासाठी उपस्थित होत्या. हे शिबिर आपल्याला स्फूर्तिदायक आणि उपयुक्त ठरले आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

# निर्मला निकेतन कॉलेजच्या विद्यार्थिनींची भेट

'निर्मला निकेतन कॉलेज ऑफ होमसायन्स' मुंबईच्या एम.एससी. च्या 'आहार तज्ज्ञ' विषयाच्या ११ विद्यार्थिनींनी आणि त्यांच्या विभागप्रमुख श्रीमती मित्रा यांनी डेरवण रुग्णालयाला दि. १५ ते १७ फेब्रुवारी २०२० या काळात भेट दिली. त्यांनी रुग्णालयातील परिचारिकांसाठी मूत्रविकार, हृदयरोग आणि मधुमेह यांनी त्रस्त रुग्णांसाठी आहार योजना कशी असावी याविषयी मार्गदर्शन केले. डेरवण सुतारवाडी येथील बचत गटाला दि. १६/२/२०२० रोजी त्यांनी भेट देऊन महिलांना सकस आणि स्वच्छ आहार कसा तयार करावा याविषयी प्रात्यक्षिकासह माहिती दिली. त्यांनी मोड आलेल्या कडधान्याची भेळ, खजूर सरबत, नाचणी लाडू व वड्या या पाककृती करून दाखविल्या. बचत गटातील महिलांनी त्यांना



*निर्मला निकेतनची सुतारवाडी डेरवण येथे भेट*




*पौष्टिक आहाराविषयी मार्गदर्शन*

शंका विचारून त्यांच्याकडून अधिक माहिती मिळवली. थोडा वेगळा विचार केला तर असे आरोग्यपूर्ण जेवण आम्हालाही तयार करता येईल असा विश्वास आम्हाला आता आला असून त्याबद्दल आम्ही आभारी आहोत असे महिलावर्गाने एकमताने सांगितले.

ग्रामीण वातावरण, कौलारू घरे, स्थानिकांचा उत्साही प्रतिसाद आदी पाहून आलेल्या पाहुण्यांनीही आपला आनंद मोकळेपणाने व्यक्त केला.

# गणपती मंदिर येथे हळदीकुंकू समारंभ

दि. २८ जानेवारी २०२० माघी गणेश जयंतीच्या दिवशी दरवर्षीप्रमाणे वालावलकर हॉस्पिटलच्या परिसरातील गणपती मंदिर येथे हळदीकुंकू समारंभ थाटात संपन्न झाला. या हळदीकुंकू समारंभात एकूण १७०० स्त्रियांनी आवर्जून भाग घेतला. सगळ्यांना वाण म्हणून 'गुळाची ढेप' देण्यात आली आणि बटाटेवडा, चहा असा अल्पोपहार देण्यात आला. गणेश मंदिरातील हळदीकुंकू ही या परिसरातील महिलांसाठी एक आनंदाची पर्वणी समजली जाते.



*गणेश मंदिरातील हळदीकुंकू*



*गुळाच्या ढेपेचे 'वाण' लुटणे - पारंपरिक प्रथा*

# ब्रिटिश वैद्यकीय पथकातील सदस्यांची बचत गटाला भेट

दि. २९ जानेवारी २०२० रोजी ब्रिटिश वैद्यकीय पथकातील सदस्यांनी वालावलकर रुग्णालयाच्या REACH प्रोजेक्टअंतर्गत असणाऱ्या बुरंबाड, तालुका संगमेश्वर येथील बचत गटाला भेट दिली. गटातील महिलांनी त्यांचे औक्षण करून स्वागत केले. सभासद महिलांनी त्यांना बचत गट तयार करत असलेल्या आंबा पल्प आणि लोणची यांच्या पाककृती करून दाखविल्या. पाहुण्यांना आंब्याचा रस, पोहे आणि चहा देण्यात आला. अस्सल कोकणी पाहुणचाराने पाहुण्या खूश झाल्या. तुमचा गाव आम्हाला खूप आवडला. तुमच्या बचत गटाचे कार्य उत्तम आहे असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला.



*औक्षण करून परदेशी पाहुण्यांचे पारंपरिक स्वागत*



*बचत गटाच्या महिलांकडून विविध पाककृतींचे प्रात्यक्षिक*

# डेरवण शिवसमर्थ गडात दासनवमी सोहळा उत्साहात साजरा

दासनवमीच्या निमित्ताने श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटबल ट्रस्ट, शिवसमर्थ गड, डेरवण येथे प्रतिवर्षी डेरवण परिसरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी समर्थ रामदासांचा दासबोध, मनाचे श्लोक, विविध अष्टके, वरयाचना, रामरक्षा, मारूतिस्तोत्र, वंदनाष्टके, आरत्या इ. संस्कारक्षम साहित्याच्या पाठांतराची स्पर्धा आयोजित केली जाते. या वर्षीही दासनवमीचे औचित्य साधून सदर स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा साजरा झाला. संस्कारांची पेरणी अव्याहतपणे करून माणसांची मने घडविण्याच्या उद्देशाने ही पाठांतर स्पर्धा गेली अनेक वर्षे आयोजित होत असून विद्यार्थी प्रतिसादही उत्तम लाभतो आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून पुणे येथील, दासबोधाच्या सखोल अभ्यासक आणि श्री समर्थ रामदासांचे चरित्र व साहित्य याच्या प्रवचनकार सौ. हर्षदा जोशी या उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनानंतर मंदिरातील वेदपाठ शाळेतील विद्यार्थ्यांनी शांतीसूक्त पठण करून वातावरण मंगलमय केले. श्रीम. स्नेहल रहाटे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला व शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी त्यांचे साडी, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. माजी केंद्रप्रमुख श्री. शिरोडकर यांनी प्रास्ताविकामध्ये श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती महाराज यांनी सुरू केलेल्या या पाठांतर स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांवर शुद्ध उच्चार, विचार व आचार यांचा संस्कार होऊन समर्थांची शिकवणच आजच्या युवा पिढीला योग्य मार्गावर आणू शकते असे सांगून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी यात सहभाग घ्यावा असे आवाहन केले.

डेरवण इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांनी रामस्तुती – 'नादातुनी या नाद निर्मितो', 'श्रीराम जयराम जयजयराम' व 'कल्याण करी रामराया' हे अभंग सादर केले. वेद वारे व गुरुराज जंगम यांनी तबला साथ केली. विद्यार्थिनी सेजल पाणिंद्रे व मुग्धा तांबे यांनी समर्थ रामदासांच्या कथा सांगितल्या.

विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमानंतर पाठांतर स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या, परिसरातील डेरवण क्र. १, हडकणी, सुतारवाडी, धनगरवाडी, कुडप, काजरकोंड, डेरवण इंग्रजी माध्यम शाळा आदी शाळांतील विद्यार्थ्यांनी पाठांतराचे नमुने सादर केले व सर्व विजयी विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. शिक्षिका सौ. हर्षदा देसाई यांनी विद्यार्थ्यांना बोधपर कथा सांगितली.

प्रमुख पाहुण्या सौ. हर्षदा जोशी यांनी दुर्गम भागातून आलेल्या विद्यार्थ्यांना समर्थ रामदासांच्या गोष्टीतून त्यांची गुणवैशिष्ट्ये सांगितली. रामदास स्वामी बारा वर्षांचे असताना त्यांनी पुढे १२ वर्षे सातत्याने केलेला व्यायाम, जप, ग्रंथवाचन यातून त्यांनी बुद्धी, शरीर व मनाचा विकास केला तसेच विद्यार्थ्यांनीही सतत शिकले पाहिजे, वाचन–पाठांतर करून मेंदूला कार्यरत ठेवून त्याचा विकास केला पाहिजे असे त्या म्हणाल्या. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी रामदास स्वामींनी सांगिलेले तीन मंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. पहिला म्हणजे योग्य दिशेने सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. दुसरा – आत्मविश्वास बाळगला पाहिजे व तिसरा – परमेश्वर व वडीलधाऱ्या माणसांवर श्रद्धा ठेवली पाहिजे. या त्रिसूत्रीचे पालन केले तर आयुष्यात यशस्वी व्हाल असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

या कार्यक्रमाला डेरवणच्या ग्रामपंचायत सदस्या सौ. विनीता चव्हाण व सौ. राजश्री गुरव, शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव, मुख्याध्यापिका श्रीम. उज्ज्वला जुन्नरकर, श्री. दीपक शिरोडकर, केंद्रप्रमुख श्री. शेंबेकर, ग्रामस्थ, शिक्षक आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सोनाली जोशी यांनी केले तर शिक्षक श्री. कोलते यांनी सर्वांचे आभार मानले.




*प्रमुख पाहुण्या सौ. हर्षदा जोशी दीप प्रज्वलन करताना*




*पाठांतर स्पर्धेत सहभागी विद्यार्थी*

# लोकमान्य टिळक स्मृती शताब्दी व्याख्यानमाला – पुष्प दुसरे

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे लोकमान्य टिळक स्मृती शताब्दी वर्षानिमित्त एक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. दि. १७ फेब्रूवारी २०२० रोजी या व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प आयोजित करण्यात आले होते. श्री. श्रीनिवास दिनकर पेंडसे हे व्याख्याता म्हणून लाभले होते. या प्रसंगी त्यांनी आपले विचार व्यक्त केले त्याचा सारांश–

‘‘या देशातील लोक पराक्रमात कमी होते म्हणून नव्हे तर इतिहासापासून काहीच शिकले नाहीत म्हणून वारंवार पारतंत्र्यात खितपत पडले. लोकमान्य टिळकांनी संपूर्ण समाज जागृत झाल्याशिवाय, पेटून उठल्याशिवाय क्रांती होणार नाही हे ओळखून स्वातंत्र्यलढ्यासाठी चार सूत्रे नक्की केली.

पहिले सूत्र म्हणजे स्वदेशी वस्तूंची निर्मिती आणि वापर. दुसरे – स्वराज्य, तिसरे – राष्ट्रीय शिक्षण. लोकशिक्षणासाठी वर्तमानपत्र आणि सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंती आणि चौथे, बहिष्कार.

स्वातंत्र्य हे ब्रिटिशांना द्यावेच लागणार आहे. पण नंतर देशाचा कारभार चालविण्यासाठी उत्तम प्रशिक्षित मनुष्यबळ लागेल म्हणून त्यांनी अनेक तरुणांना परदेशी उच्च शिक्षणासाठी पाठवले.

तुरुंगवासाची शिक्षा झाल्यावर टिळक म्हणाले की सरकार मला तुरुंगात टाकील पण जोपर्यंत माझे विचार स्वतंत्र आहेत तोपर्यंत स्वातंत्र्यलढा थांबणार नाही.

टिळकांना केवळ स्वतंत्र भूप्रदेश अपेक्षित नव्हता तर त्यांच्या विचारांचा देश हवा होता. त्यांच्या विचारांचा देश असे म्हणताना, त्यांना दुसऱ्यांच्या विचारांबद्दल जराही अनादर नव्हता. ते जेव्हा न्यू इंग्लिश स्कूलमधून बाहेर पडले तेव्हा त्यांनी वेगळी नवी शाळा काढली नाही. ही शाळाच मोठी झालेली मला पहायची आहे असे ते म्हणाले.




*श्री. श्रीनिवास पेंडसे व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना*

लोकमान्यांना सरकारने मंडालेच्या तुरुंगात ठेवले कारण तेथील विषम, रोगट हवेत त्यांचा बळी जावा अशी ब्रिटिशांची इच्छा होती. पण तेथे टिळकांनी ४५० पुस्तकांचा अभ्यास केला आणि 'गीतारहस्य' लिहिले. आयुष्यभर टिळक विद्यार्थी राहिले. अनेक भाषांवर त्यांनी प्रभुत्व मिळविले. मंडालेहून सहा महिने आधी सुटका करताना सरकारने दोन अटी घातल्या होत्या. एक म्हणजे सत्कार स्वीकारू नये आणि दुसरी अट म्हणजे राजकीय भूमिका घेऊ नये. टिळकांनी पहिली अट स्वीकारली, दुसरी मात्र साफ फेटाळून लावली.

तुरुंगातून बाहेर येताच पहिला अग्रलेख लिहिला-'पुनश्च हरी ॐ' त्यानंतर एकीकडे ज्यातिषशास्त्राचा अभ्यास केला आणि त्याच वेळी देशभर पुन्हा आंदोलनाचा वणवा पेटविला. 'ओरायन' हा टिळकांचा ग्रंथ वाचून मॅक्समुल्लर सारखा विद्वान माणूस एवढा प्रभावित झाला होता की अशा माणसाला तुरुंगात ठेवणे योग्य नाही असे त्याने ब्रिटिशांना सांगितले आणि त्यांची सहा महिने आधी सुटका झाली. संकटकाळी आपली माणसेसुद्धा दूर जातात. मात्र असे प्रेम केवळ राष्ट्रीय चारित्र्य असलेल्या माणसालाच मिळते.

बहिष्कार या चौथ्या अस्त्राचाही टिळकांनी उत्तम उपयोग केला. कामगार-मजुरांमध्येही त्यांनी जागृती केली. त्यामुळे समाजातील सर्व स्तरातील लोकांचे प्रेम त्यांना मिळाले. टिळकांना शिक्षा झाली त्या वेळी अनेकांनी चहा सोडला, तुरुंगात त्यांना चांगले जेवण मिळत नाही म्हणून अनेकांनी एक वेळचे जेवण सोडले.

टिळकांच्या चतु:सुत्रीला प्रखर विरोध केवळ ब्रिटिशांनी नव्हे तर एतद्देशीय पुढाऱ्यांनीही केला. टिळक आणि आगरकरांमध्ये मतभेद झाले. ते व्हायला नको होते. पण झाले म्हणून दोघांचेही कार्य थांबले नाही. भिडे नामक गृहस्थ महारवाड्यामध्ये शाळा चालवतात हे म्हटल्यानंतर 'सनातनी' असलेले टिळक त्यांच्या त्या वाडीतल्या शाळेपर्यंत जातात, तिथे भोजन करतात. सनातन या शब्दाचा खरा अर्थ 'नित्य नूतन' असा आहे. त्या अर्थाने टिळक सनातनी होते.

स्वत:चा मुलगा गेला तेव्हाही टिळक अग्रलेख लिहित होते. गीतेतील स्थितप्रज्ञता आणि कर्मयोग त्यांनी आयुष्यभर अंगीकारला होता आणि ते यथार्थतेने तसे जगले. आंदोलन शस्त्राचारी असावे असे त्यांचे मत नव्हते परंतु सशस्त्र क्रांतिकारकांचे त्यांनी सदैव समर्थन केले.

टिळक हे स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे प्रणेते होते. 'असंतोषाचे जनक' हे आपण म्हणण्याचं कारण नाही. तो टिळकांचा गौरव नाही. तो टिळकांचा ब्रिटीश सरकारने केलेला एक प्रकारचा अपमान आहे. याचे कारण टिळक जरी असंतोषाचे जनक असले तरी असंतोषाचे प्रणेते होण्याच्या पाठीमागची भूमिका सरकारची होती.

टिळकांच्यानंतर गांधीयुग निर्माण झालं पण मित्रांनो, महात्माजींना सुद्धा म्हणावं लागलं की टिळक जिथे थांबले होते तेथून मी पुढे निघालो म्हणूनच मला स्वातंत्र्यप्राप्तीचं आंदोलन यशस्वी झालेलं पाहता आलं आणि मित्रांनो, नियतीनं जर टिळकांना आणखी काही वर्ष आयुष्य दिलं असतं तर कदाचित स्वातंत्र्याची प्राप्ती लवकर झाली असती. ४७ सालापर्यंत वाट पहावी लागली नसती. याचं कारण, टिळक खणखणीतपणे सांगत होते की आम्हाला सुधारणा नको, स्वातंत्र्य हवे! स्वातंत्र म्हणजे स्वराज्य आणि आमच्या स्वराज्याच्या यज्ञभूमीसाठी आम्ही शेवटपर्यंत लढू! ही प्रेरणा टिळकांपासून अनेकांना प्राप्त झाली. अनेकजण लढण्यासाठी उभे राहिले.

आपणाला सीमांचं स्वराज्य प्राप्त झालं. एतद्देशीय राज्यकर्त्यांनी राज्य करावं असं स्वराज्य प्राप्त झालं. पण अजूनही पूर्ण स्वातंत्र आपल्याला मिळालं नाही. अजूनही आमच्यावरचे परदेशी संस्कार गेले नाहीत. या मातीला आवश्यक असणारे संस्कार आवश्यक आहेत. आम्हाला घाम गाळायच्या सवयी झाल्या तर आपले बरचेसे रोग बाजूला होतील. पण त्याच्याकरता एका नव्या आंदोलनाची गरज आहे. आम्हाला परत एकदा लिहायचं आहे, परत एकदा वाचायचं आहे, परत एकदा संयुक्त भारताच्या जडणघडणीसाठी टिळकांसारखं राष्ट्रीय चारित्र उभं करण्याकरिता आपल्याला पुढे व्हायचं आहे. आपापसातले मतभेद, रूढिप्रियता, परंपरावादी गोष्टी या सगळ्या शत्रूंना आपल्याला पराभूत केलं पाहिजे; तेव्हाच नवभारताची निर्मिती होईल आणि परत पारतंत्र्याची नांदी कधीही होणार नाही.

हिंदुस्तानाला स्वातंत्र मिळून ७२ वर्षे झाली. साधारण साठीनंतर आपण वृद्धत्वाकडे वाटचाल करतो असे म्हणतात. पण आपण परत एकदा पारतंत्र्याच्या दिशेने जात नाही आहोत ना? ज्या देशामध्ये 'वंदेमातरम्, भारत माता की जय' हे म्हणण्यासाठी गोळ्या झेलल्या गेल्या, बाबू गेनूंसारखे तरुण फासावर लटकले, त्याच देशामध्ये याच्याविरूद्ध घोषणा ऐकताना मनात विचार येतो की परत एकदा पारतंत्र्याच्या दिशेने भविष्यकाळाची वाटचाल सुरू नाही ना?''

समाजामध्ये प्रबोधनाची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर आहे आणि त्यासाठी अशी व्याख्यानमाला आयोजित केल्याबद्दल श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टला धन्यवाद देऊन त्यांनी आपले व्याख्यान समाप्त केले.

# राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघांची विजयी झेप

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा परिषद, रत्नागिरी यांच्यावतीने १७ वर्षाखालील मुले आणि मुलींसाठीची ६५ वी 'राष्ट्रीय शालेय डॉजबॉल' स्पर्धा दि. २७ ते ३० जानेवारी या कालावधीत क्रीडासंकुलात आयोजित करण्यात आली होती. 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'च्या आच्छादित मैदानात ही राष्ट्रीय स्पर्धा जल्लोषात पार पडली. संपूर्ण भारतातील खेळाडू, प्रशिक्षक, पालक वर्ग यांना क्रीडासंकुल पाहता यावे, क्रीडासंकुलातील सुविधांची माहिती व्हावी व उत्तम खेळाडू घडावे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून क्रीडासंकुलात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते. त्याला अनुसरूनच ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा घेण्यात आली.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री. सुनील चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी बोलताना त्यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या मंचकावर माणिकराव ठोसरे साहेब, संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, चिपळूणचे प्रांत प्रवीण पवार, तहसीलदार जयराज सूर्यवंशी, श्री विठ्ठलराव जोशी चारिटीज ट्रस्टचे प्रतिनिधी व टेबल टेनिस खेळाचे राष्ट्रीय खेळाडू अजित गालवणकर तसेच 'महाराष्ट्र राज्य डॉजबॉल असोसिएशन'चे महासचिव व शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. हनुमंत लुंगे, क्रीडासंकुलाचे संचालक श्रीकांत पराडकर आणि जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, 'रत्नागिरी जिल्हा डॉजबॉल असोसिएशन'चे सचिव उदयराज कळंबे उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमामध्ये सावर्डे स्कूलच्या एम.सी.सी. ग्रुपने उत्तम संचलन केले, तसेच महाराष्ट्रीय संस्कृतीचे रेकॉर्ड डान्सच्या माध्यमातून दर्शन घडवले. एसव्हीजेसीटी इंग्लिश मिडियम स्कूलच्या योगाच्या संघाने उत्तम मनोरे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच निहाल विचारे याने मल्लखांब प्रात्यक्षिक सदर करून प्रेक्षकांना आश्चर्यचकित केले. विविध कार्यक्रमांमुळे उद्घाटन कार्यक्रमाला रंगत आली. निहाल विचारे याची मल्लखांब प्रात्यक्षिके आणि स्वरा गुजर हिने सादर केलेली योग प्रात्यक्षिके पाहून प्रभावित झालेल्या जिल्हाधिकारी श्री. सुनील चव्हाण यांनी भरघोस रोख रकमेची बक्षिसे देऊन त्यांचे कौतुक केले.



*राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेचा शुभारंभ*



राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेचा शुभारंभ



राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेतील एक क्षणचित्र

ही स्पर्धा १७ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटामध्ये खेळविण्यात आली. यामध्ये देशभरातून १० राज्यांतून २०० खेळाडू व २० मार्गदर्शक आणि २० व्यवस्थापक सहभागी झाले. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी महाराष्ट्राच्या मुले आणि मुलींच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करीत अंतिम फेरीत धडक मारली. दुसऱ्या दिवशी मुलींच्या संघाने मध्यप्रदेश, तामिळनाडू, विद्याभारती आणि राजस्थान अशा संघाना सरळ सेटमध्ये पराभव करीत सेमी फायनलमध्ये दिल्ली संघाला धूळ चारत फायनलमध्ये प्रवेश केला. गोवा संघाबरोबर अंतिम लढत जिंकून महाराष्ट्र संघाने आपले नाव अजिंक्यापदावर कोरले.

महाराष्ट्राच्या मुलांच्या संघाने मध्यप्रदेश, विद्याभारती, पंजाब, राजस्थान आणि सेमी फायनलमध्ये तामिळनाडू संघाला पराजित करून अंतिम सामन्यात दिल्ली संघाला पराभूत करून विजेतेपद पटकावले आहे. महाराष्ट्र संघातील मुलींच्या संघामध्ये साक्षी हजारे, साक्षी लोहार, पूजा रहाटे, मिटक झुनगरे, तर मुलांच्या संघात राजू लोमटे, रोहित चांदणे, राहुल गुणदी, विवेककुमार कुशवाह, अभय कापुरे या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करीत संघाला विजयी केले.



राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेचा शुभारंभ

# डेरवण क्रीडासंकुलामध्ये 'ऑल इंडिया चॅम्पियनशिप फुटबॉल स्पर्धा'

'शिवरत्न क्रीडा संघटना' आयोजित 'ऑल इंडिया इंटरक्लब फुटबॉल चॅम्पियनशिप' स्पर्धा एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दि. १५ आणि १६ फेब्रुवारी रोजी झाली. महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक या राज्यातून आलेल्या नामवंत १६ संघांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत गोवा व पुणे संघाने विजेतेपद पटकावले.

१५ व १७ वर्षाखालील मुलांसाठीच्या गटात ही स्पर्धा घेण्यात आली होती. स्पर्धेचे उद्घाटन उदयराज कळंबे, 'जिल्हा फुटबॉल असोसिएशन'चे अध्यक्ष प्रसाद परांजपे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेसाठी औरंगाबाद, पुणे, नाशिक, दिल्ली, वाशी, यवतमाळ, धुळे, मुंबई, मडगांव, बंगलोर, ठाणे, अहमदनगर, अहमदाबाद, सिंधुदुर्ग आदी ठिकाणाहून नामवंत संघ सहभागी झाले होते.

१५ वर्षाखालील वयोगटातील पहिला उपांत्यफेरीचा सामना गोवा विरुद्ध पुणे यांच्यात झाला. यात गोवा विजयी ठरला. तर दुसरा उपांत्य फेरीचा सामना नाशिक विरुद्ध एसव्हीजेसीटी यांच्यात झाला. यात एसव्हीजेसीटीने बाजी मारली. अंतिम सामन्यात गोव्याने एसव्हीजेसीटी संघावर १–० असा विजय मिळवत चषक पटकावला.

१७ वर्षाखालील वयोगटात पहिला उपांत्य फेरीचा सामना औरंगाबाद विरुद्ध पुणे यांच्यात झाला. यात पुणे संघ विजेता ठरला. तर दुसरा उपांत्य फेरीचा सामना मडगांव विरुद्ध गोवा यांच्यात झाला. यात गोवा विजेता ठरला. अंतिम सामन्यात गोव्याचा पुणे संघाने २–० असा पराभव करीत विजेतेपद पटकावले.

१५ वर्षाखालील गटात उत्कृष्ट खेळाडू म्हणून नथान दिस, गोलकीपर म्हणून पुणे संघाचा दशरथ राठोड, उत्कृष्ट खेळाडू म्हणून पुणे संघाचा ओम कांबळी, तर १७ वर्षाखालील गटात उत्कृष्ट खेळाडू म्हणून गोवा संघाचा ओंकार पेढांबकर, उत्कृष्ट खेळाडू म्हणून रवी राठोड यांना सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेदरम्यान शिवरत्न क्रीडा संघटनेच्या राज्य, राष्ट्रीय स्तरावर कामगिरी केलेल्या साक्षी जड्याळ, संदीप जोशी, सिद्धेश भुवड, रिया शिंदे, आदींना विशेष सन्मानित करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय खेळाडू श्रीपाद पाटील, विक्रम रावत, अविनाश पवार, सुहास कांगणे, सतीश कदम, जगदीश गावडे, आदींनी प्रयत्न केले.



ऑल इंडिया चॅम्पियनशिप फुटबॉल स्पर्धा – क्षणचित्र

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



ऑल इंडिया चॅम्पियनशिप फुटबॉल स्पर्धा – क्षणचित्र

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून मार्च २०२० मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०१ मार्च | डॉ. भावेश पोपट, मुंबई (रेडीऑलॉजीस्ट) | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| ०७ मार्च | डॉ. मंदार अक्कलकोटकर, पुणे | आयुर्वेदिक तपासणी व उपचार |
| १४ मार्च | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंट्रोलॉजीस्ट) | पचनसंस्थेवरील तपासणी व उपचार |
| १५ मार्च | डॉ. संजय ओक, मुंबई (बालरोग तज्ञ) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया व उपचार |
| २१ मार्च | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग तपासणी व उपचार |
| २१ मार्च | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| २१ मार्च | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक) | त्वचारोग व गुप्तरोग तपासणी व उपचार |
| २२ मार्च | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी आजार व उपचार |
| २२ मार्च | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार निदान व उपचार |

**१) डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**

**२) श्रवण यंत्र (बहिरेपणाचे मशीन) व वाचा ऊच्चार तज्ज्ञ (स्पीच थेरपिस्ट) दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी वालावलकर रुग्णालयात भेटतील**

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. | Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०